# अभंग - ज्ञानेश्वरी
## अध्याय दुसरा

संजय उवाच —
तं तथा कृपयाऽऽविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम् ।
विषीदन्तमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

**मग रायालागीं । म्हणे तो संजय । पुढें झालें काय । ऐकें आतां ॥१॥**
**रणांगणीं पार्थ । ऐशापरी खिन्न । होवोनि [१] रुदन । करूं लागे ॥२॥**
**उपजला चित्तीं । मोह विलक्षण । सर्व आप्तजन । देखोनियां ॥३॥**
**तेणें त्याचें चित्त । द्रवोनियां गेलें । जलें पाझरलें । जैसें मीठ ॥४॥**
**हृदय सधीर । परी [२] विरमलें । वातें [२] झळंबलें । [३] अभ्र जैसें ॥५॥**
**किंवा राजहंस । कर्दमीं रुतावा । मग तो दिसावा । [४] म्लान-मुख ॥६॥**
**तैसा दिसे पार्थ । अति कोमेजला । [५] कारुण्यें व्यापिला । म्हणोनियां ॥७॥**
**देखोनि तो ऐसा । महा-मोहें [६] ग्रस्त । तयासी श्रीकांत । काय बोले ॥८॥**

श्रीभगवानुवाच —
कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ।
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥२॥

**म्हणे पार्था आधीं । करीं तूं विचार । येथें हा आचार । योग्य काय ॥९॥**
**कोण तूं गा काय । करिसी हें येथें । काय झालें तूतें । सांगें मज ॥१०॥**
**कशासाठीं खेद । तुज उणें [७] काई । करूं जातां कांहीं । राहिलें का ? ॥११॥**

---

१ रडूं लागला. २ विरघळलें. ३ ढग. ४ खिन्न. ५ करुणेने. ६ पछाडलेला. ७ काय.

न देसी तूं चित्त । अयोग्य गोष्टीसी । धीर ना सोडिसी । कदा काळीं ॥१२॥
नाम तुझें मात्र । ऐकोनि साचार । होतें दिशापार । अपयश ॥१३॥
शौर्याचा तूं ठाव । क्षत्रियांत राव । युद्धीं तुझें नांव । तिन्हीं लोकीं ॥१४॥
*निवात-कवच । मारिले असुर । जिंकिला *शंकर । संग्रामीं तूं ॥१५॥
झाले तुजपुढें । *गंधर्व बापुडे । [1]पौरुष [2]चोखडें । ऐसें तुझें ॥१६॥
काय सांगूं तुझ्या । प्रभावाचें [3]मान । त्रैलोक्य हि [4]सान । वाटतसे ॥१७॥
तो तूं आज येथें । सांडोनियां शौर्य । रडतोसी काय । [5]अधोमुख ॥१८॥
पाहें तूं अर्जुन । तुज आकळून । करावें का दीन । कारुण्यानें ? ॥१९॥
सूर्यातें अंधार । ग्रासील का वीरा । भिईल का वारा । मेघालागीं ॥२०॥
किंवा अमृतासी । आहे का मरण । अग्नीतें सर्पण । गिळी काय ? ॥२१॥
संसर्गाची बाधा । होवोनि मरेल । काय *हालाहल । सांगें मज ॥२२॥
किंवा मिठानें का । पाणी पाझरेल । बेडूक गिळील । भुजंगासी ॥२३॥
सिंहाशीं जंबूक । कैसा झगडेल । ऐसें का घडेल । अघटित ॥२४॥
अघटितासी ह्या । परी साचपणा । आज तूं अर्जुना । आणिलासी ! ॥२५॥
पार्था, अजूनी हि । धरोनियां धीर । तोडीं हा सत्वर । मोह-पाश ॥२६॥
होईं सावधान । सांडीं मूर्खपण । ऊठ चाप-बाण । सज्ज करीं ॥२७॥
नको नको ऐसें । रणीं हें कारुण्य । आहेस तूं सुज्ञ । धनुर्धरा ॥२८॥
करोनि विचार । सांगें धनंजया । संग्रामीं ही दया । योग्य काय ॥२९॥
येणें इहलोकीं । तुझा दुर्लौकिक । आणि परलोक । अंतरेल ॥३०॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ।
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥३॥

तरी नको शोक । पुरा धरीं धीर । पार्थासी श्रीधर । ऐसें बोले ॥३१॥
आप्तांसाठीं खेद । करावा रणांत । नव्हे हें उचित तुजलागीं ॥३२॥
लोपेल तें येणें । जोडलें बहुत । आतां तरी हित । विचारीं गा ॥३३॥
हें तों रणांगण । पार्था घेईं चित्तीं । येथें दया-वृत्ति । कामा नये ॥३४॥

---

*परिशिष्ट पहा. १ पराक्रम २ निष्कलंक. ३ प्रमाण; थोरवी. ४ लहान. ५ खाली मान घातलेला.

आतां चि हे काय । सोयरे दिसावे । नव्हतें का ठावें । आधीं तुज ।।३५।।
काय नव्हतासी । ओळखीत ह्यांसी । वायां कां करिसी । अतिरेक ।।३६।।
जन्मोनियां तुज । युद्धाचा प्रसंग । आतां चि का सांग । आला येथें ।।३७।।
तुम्हां एकमेकां । युद्धाचें निमित्त । असे सदोदित । धनंजया ।।३८।।
तरी नेणों तुज । आतां काय झालें । कैसें उपजलें । कारुण्य हें ।।३९।।
परी पार्था हें तों । कृत्य [१]अनुचित । ऐसें चि निश्चित । वाटे मज ।।४०।।
गुंततां मोहांत । ऐशापरी देख । लाभला लौकिक । दुरावेल ।।४१।।
इह-परलोक । दोन्ही अंतरोनि । होईल [२] निदानीं । अकल्याण ।।४२।।
युद्धीं हृदयाचें । ऐसें ढिलेपण । अध:पात जाण । क्षत्रियांसी ।।४३।।
नाना परी ऐसें । प्रभु कृपावंत । असे शिकवीत । पार्थालागीं ।।४४।।
ऐकोनि हे बोल । पार्थ काय म्हणे । इतुकें बोलणें । नको देवा ।।४५।।

अर्जुन उवाच—
कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ।
इषुभि: प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ।।४।।

प्रभो, आधीं तूं चि । करीं हा विचार । असे का साचार । संग्राम हा ।।४६।।
नव्हे नव्हे युद्ध । हा तरी [३] प्रमाद । आचरितां [४] बाध । दिसे येथें ।।४७।।
हें तों थोरांचिया । [५] उच्छेदाचें कृत्य । [६]ओढवलें सत्य । आम्हांवरी ।।४८।।
माता-पितरांची । करावी कीं सेवा । तयां तोष द्यावा । सर्वांपरी ।।४९।।
परी सांगें देवा । तयांसी मागुतें । आपुल्या चि हातें । वधावें का ? ।।५०।।
करावें वंदन । संतसज्जनांतें । पूजावें तयांतें । घडे तरी ।।५१।।
परी हें सांडोनि । स्व-मुखें गोविंदा । केविं त्यांची निंदा । करावी गा ।।५२।।
पाहें कुलगुरु । तैसे हे आमुचे । पूजनीय [७]साचे । नित्य आम्हां ।।५३।।
भीष्मद्रोणांचा कीं । अत्यंत मी ऋणी । मज ही करणी । नये मना ।।५४।।
स्वप्नांत हि ज्यांचें । चिंतिलें ना वैर । प्रत्यक्ष ते ठार । करूं कैसे ।।५५।।
आजवरी आम्हीं । केला जो अभ्यास । वधोनियां ह्यांस । मिरवावा ।।५६।।

---

१ अयोग्य. २ शेवटीं. ३ घोडचूक. ४ दोष. ५ नाशाचें. ६ आलें. ७ खरोखर.

ऐसें सर्वांनीं च । योजिलें कां मनीं । बरवें त्याहूनि । मरण हि ।।५७।।
तूं चि पाहें देवा । द्रोणाचा मी [१] चेला । तेणें शिकविला । [२] धनुर्वेद ।।५८।।
त्या चि उपकारें । होवोनि आभारी । तयाच्या [३] जिव्हारीं । घाव घालूं ? ।।५९।।
ज्याचिया कृपेनें । व्हावी वर-प्राप्ति । त्याचा घात चित्तीं । धरावया ।।६०।।
प्रभो सांगें मी का । असें *भस्मासुर । मज हा विचार । साहवेना ! ।।६१।।

गुरूनहत्वा हि महानुभावान् ।
श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ।
हत्वाऽर्थकामांस्तु गुरूनिहैव
भुञ्जीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ।।५।।

पाहें सागरातें । बोलती गंभीर । तो हि वरवर । दिसे तैसा ।।६२।।
परी नव्हे तैसें । द्रोणाचें [४] अंतर । प्रशांत गंभीर । असे नित्य ।।६३।।
पाहतां नभासी । अंत पार नाहीं । वरी तयातें हि । मोजवेल ।।६४।।
द्रोणाचें हृदय । परी गूढ चांग । सर्वथा अथांग । दिसे आम्हां ।।६५।।
काळाचिया ओघीं । वज्र हि फुटेल । अवीट विटेल । अमृत हि ।।६६।।
परी नित्य शांत । ह्याची मनोवृत्ति । चळे ना कल्पान्तीं । क्षोभवितां ।।६७।।
माउलीची माया । साच वाखाणिती । परी कृपा-मूर्ति । द्रोणाचार्य ।।६८।।
पार्थ म्हणे कीं हा । दयेचें माहेर । गुणांचें भांडार । सकल हि ।।६९।।
तेवीं चि अपार । विद्येचा सागर । ऐशा परी थोर । महात्मा हा ।।७०।।
वरी आम्हांलागीं । होय कृपावंत । सांगें ह्यासी घात । चिंतावा का ? ।।७१।।
ऐसियांतें रणीं । करोनियां ठार । भोगावें अपार । राज्य-सुख ।।७२।।
नको नको हें तों । नये माझ्या मना । त्याहुनी जीवना । लागो आग ! ।।७३।।
ऐसें हें [५] दुर्घट । ह्याहुनी हि श्रेष्ठ । भोग झाले प्राप्त । जरी मज ।।७४।।
तरी ते जळोत । नको त्यांचा संग । स्वीकारावें चांग । भिक्षा-पात्र ।।७५।।
किंवा देश-त्याग । करोनियां जावें । आनंदें रहावें । वनांतरीं ।।७६।।
परी आतां केला । निर्धार अंतरीं । शस्त्र ह्यांच्यावरी । धरूं नये ।।७७।।

---

१ शिष्य. २ तिरंदाजीचे शास्त्र; युद्धशास्त्र. ३ मर्मावर. ४ मन; अंत:करण. ५ कठीण; अशक्य.

प्रभो नव्या तीक्ष्ण । धारेच्या बाणांनीं । ह्यांच्या मर्मस्थानीं । [१] प्रहारोन ॥७८॥
ऐसे रक्तामाजीं । बुडाले जे भोग । ते चि घ्यावे मग । शोधोनियां ॥७९॥
तरी सांगें कृष्णा । माखले रक्तानें । काढोनि ते कोणें । सेवावे गा ॥८०॥
करिसी युद्धाचें । तूं जें [२] समर्थन । पटे ना तें जाण । ह्या चि साठीं ॥८१॥
ऐसें तिये वेळीं । बोलिला अर्जुन । म्हणे अवधान । देईं देवा ॥८२॥
ऐकोनि तें नाहीं । देवासी मानलें । तेणें मन भ्यालें । पार्थाचें हि ॥८३॥
म्हणोनि तो पुन्हां । म्हणे दयाघना कां हो चित्त द्याना । माझ्या बोला ॥८४॥

न चैतद्विद्म: कतरन्नो गरीयो
यद्वा जयेम यदि वा नो जयेयु: ।
यानेव हत्वा न जिजीविषाम—
स्तेऽवस्थिता: प्रमुखे धार्तराष्ट्रा: ॥६॥

माझ्या मनांतील । मी तरी साचार । कथिला विचार । तुम्हांलागीं ॥८५॥
ह्या हि वरी आतां । असेल उचित । तरी तें समस्त । जाणां तुम्हीं ॥८६॥
प्राणान्तीं हि ज्यांशीं । धरावें ना वैर । ते उभे समोर । झुंजावया ॥८७॥
ह्यांतें वधावें कीं । [३] अव्हेरोनि जावें । दोहोंत बरवें । नेणों आम्ही ॥८८॥

कार्पण्यदोषोपहतस्वभाव:
पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेता: ।
यच्छ्रेय: स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे
शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥७॥

मोहानें व्याकुळ । झालें माझें चित्त । सुचेना [४] उचित । पाहतां हि ॥८९॥
दृष्टींतील तेज । लोपतें सर्वथा । नेत्रीं सारा येतां । नेत्र-रोगें ॥९०॥
मग [५] समीप हि । असोनि पदार्थ । दृष्टी असमर्थ । देखावया ॥९१॥
तैसे माझें मन । झालें [६] भ्रांति-ग्रस्त । आतां जें स्व-हित । तें हि नेणें ॥९२॥
तरी तुवां देवा । करोनि विचार । सांगावें साचार । भलें तें चि ॥९३॥
आमुचा तूं सखा । आमुचें सर्वस्व । गुरु बंधु देव । आमुचा तूं ॥९४॥

---

१ हाणून. २ बाजू घेतोस. ३ टाकून. ४ योग्य. ५ जवळ. ६ गोंधळलेलें.

तूं चि माता पिता । तूं चि आम्हां [१] त्राता । संकटीं रक्षिता । सर्व काळ ॥९५॥
करूं नेणे गुरु । शिष्याचा अव्हेर । नदीतें सागर । त्यजी केविं ॥९६॥
सोडोनियां जातां । [२] अपत्यातें माय । कैसी गति होय । सांगें कृष्णा ॥९७॥
सर्वां परी तैसा । आम्हांसी आधार । प्रभो निरंतर । तूं चि एक ॥९८॥
आणि जरी माझें । मागील बोलणें । तुजलागीं माने । ऐसें नाहीं ॥९९॥
तरी जें उचित । धर्मशास्त्राधारें । [३] झणीं तें मुरारे । सांगें मज ॥१००॥

न हि प्रपश्यामि ममापनुद्याद्
यच्छोकमुच्छोषणमिन्द्रियाणाम् ।
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं
राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥८॥

सकळ हें कुळ । देखोनि ह्या वेळां । खेद उपजला । मानसीं जो ॥१०१॥
न जाय आणिकें । प्रभो हृषीकेशा । तुझ्या उपदेशा । वांचोनि तो ॥१०२॥
पृथ्वीचें साम्राज्य । जरी हातीं आलें । किंवा प्राप्त झालें । इंद्र-पद ॥१०३॥
तरी न फिटेल । अंतरींचा मोह । अल्प हि [४] संदेह । नसे येथें ॥१०४॥
भाजलेलें बीज । सुक्षेत्रीं पेरिलें । रुजे ना तें भलें । शिंपिलें हि ॥१०५॥
आयुष्यान्तीं व्यर्थ । दिव्यौषधें जेविं । एकचि वांचवी । परमामृत ॥१०६॥
तैसें राज्य-भोग । संपत्ति वैभव । मज सर्वथैव । अर्थहीन ॥१०७॥
येथें दयानिधे । तुझ्या कृपेविण । बुद्धीसी जीवन । दुजें नाहीं ॥१०८॥
ऐका, तो अर्जुन । ऐसें क्षणभरी । बोले भानावरी । येवोनिया ॥१०९॥
भ्रांति-लहरीनें । मग पुन्हां तेथें । व्यापिलें पार्थातें । पूर्ववत् ॥११०॥
नव्हे ती लहरी । वाटतें निराळें । डंखिला तो [५] व्याळें । महा-मोहें ॥१११॥
हृदय-कमळ । हें चि मर्म-स्थळ । तेविं सांजवेळ । कारुण्याची ॥११२॥
तेथें दंश झाला । कारुण्याच्या भरीं । म्हणोनि लहरी । ओसरे ना ॥११३॥
मोहरूपी काळ – । सर्पाचें तें विष । दाहक विशेष । जाणोनियां ॥११४॥
जयाचिया [६] कृपा–। कटाक्षेंकरून । जाय हारपून । विष-बाधा ॥११५॥

---

१ उद्धार करणारा. २ मुलाला. ३ सत्वर. ४ संशय. ५ सापानें. ६ कृपादृष्टीनें पाहतांच.

घाली भक्ताचिया । हांकेसवें उडी । ऐसा तो गारुडी । ठाके तेथें ॥११६॥
कैसा [१] शोकाकुल । अर्जुनाशेजारीं । सांवळा श्रीहरि । शोभतसे ॥११७॥
होवोनि कृपाळ । आतां तो गोपाळ । तयासी रक्षील । लीलामात्रें ॥११८॥
ह्या चि साठीं पार्थ । [२] मोह-फणि-ग्रस्त । ऐसें मी यथार्थ । उल्लेखिलें ॥११९॥
असो, तो अर्जुन । महा-मोहें व्याप्त । मेघें आच्छादित । सूर्य जैसा ॥१२०॥
मग रानींवनीं । लागोनि वणवा । पर्वत पेटावा । ग्रीष्म-काळीं ॥१२१॥
देखोनियां पार्थ । तैसा शोकाकुळ । वोळला गोपाळ । महा-मेघ ॥१२२॥
शोभला सहज । भला नीलवर्ण । जो कीं जलपूर्ण । कृपामृतें ॥१२३॥
दिव्य दंतप्रभा । तीच [३] सौदामिनी । गंभीर जी वाणी । गर्जना ती ॥१२४॥
होतां कृपावृष्टि । तेणें कैसा शांत । होईल पर्वत । पार्थरूपी ॥१२५॥
मग तेथें कैसा । नवा जोरदार । ज्ञानाचा अंकुर । [४] विरूढेल ॥१२६॥
ती च कथा आतां । ऐका शांतचित्तें । म्हणे श्रोतयांतें । ज्ञानदेव ॥१२७॥

संजय उवाच–
एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ।
न योत्स्य इति गोविन्दमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥९॥

संजय तो म्हणे । ऐक राया तेथ । मग पुन्हां पार्थ । काय बोले ॥१२८॥
पावोनियां खेद । म्हणे श्रीकृष्णातें । नका घालूं मातें । भीड आतां ॥१२९॥
कांहीं होवो परी । नाहीं झुंजणार । अढळ निर्धार । हा चि माझा ॥१३०॥
ऐसे एक वेळ । उच्चारोनि शब्द । राहिला तो स्तब्ध । मग तेथें ॥१३१॥
देखोनियां स्तब्ध । ऐसा धनंजय । वाटला विस्मय । कृष्णालागीं ॥१३२॥

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदन्तमिदं वचः ॥१०॥

आपुलिया मनीं । मग ऐसें म्हणे । काय हें अर्जुनें । आरंभिलें ॥१३३॥
सर्वथैव कांहीं । नेणे धनंजय । करावा उपाय । काय आतां ॥१३४॥
पडोनि उमज । आतां कैशा रीती । पार्थ [५] धैर्यवृत्ति । स्वीकारील ॥१३५॥

---

१ दुःखाने कळवळलेल्या. २ मोहरूपी सापानें गिळलेला. ३ वीज. ४ रुजेल. ५ धीराची वागणूक.

* पंचाक्षरी जैसें । बांधी अनुमान । पिशाच्च तें कोण । बाधे कैसें ।।१३६।।
नातरी *असाध्य । देखोनियां [1] व्याधि । योजी दिव्यौषधि । वैद्य जैसा ।।१३७।।
जी का परिणामीं । टाळोनि मरण । अमृतासमान । जीववील ।।१३८।।
तैसें श्रीअनंत । अंतरीं योजित । जेणें रणीं पार्थ । भ्रांति सांडी ।।१३९।।
मग तो चि मनीं । धरोनि उद्देश । रोषें हृषीकेश । बोलूं लागे ।।१४०।।
बालकातें माय । रागें बोले तरी । झांकलें अंतरीं । प्रेम जैसें ।।१४१।।
वरी औषधाचें । दिसे कडूपण । परी देई गुण । अमृताचा ।।१४२।।
तैसें वरीवरी । पाहतां कठोर । परी हितकर । परिणामीं ।।१४३।।
आतां सावधान । ऐका श्रोतेजन । रसाळ भाषण । गोविंदाचें ।।१४४।।

श्रीभगवानुवाच–
अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ।
गतासूनगतासूंश्च नानुशोचन्ति पण्डिता: ।।११।।

मग पार्थालागीं । देव बोले काय । अर्जुना आश्चर्य । देखिलें हें ।।१४५।।
कीं जें तुवां आज । युद्ध-भूमीवरी । ऐसें दीनापरी । आरंभिलें ।।१४६।।
म्हणविसी पार्था । सुज्ञ तूं आपणा । परी सोडिसी ना । अज्ञपण ।।१४७।।
शिकवावें तरी । सांगसी किरीटी । पांडित्याच्या गोष्टी । तूं चि आम्हां ।।१४८।।
जन्मतां जें अंध । लागावें त्या [2] पिसें । मग धांवे जैसें । [3] सैरावैरां ।।१४९।।
तैसें मज दिसे । तुझें सुज्ञपण । नेणसी आपण । कोण तूं हें ।।१५०।।
परी कौरवांचें । तुज दु:ख मोठें । आश्चर्य हें वाटे । वारंवार ।।१५१।।
सांगें धनंजया । तुजमुळें काय । आलें लोक-त्रय । अस्तित्वासी ।।१५२।।
विश्वाची रचना । असे [4] सनातन । काय [5] अप्रमाण । म्हणावें तें ।।१५३।।
सर्वशक्तिशाली । ईश्वरापासोन । होतसे निर्माण । प्राणिमात्र ।।१५४।।
बोलती जें ऐसें । जगामाजीं पार्था । सर्वथा तें वृथा । मानावें कां ।।१५५।।
जन्म-मृत्यू हे तों । निर्मिले तूं पार्थें । म्हणावें का येथें । ऐसें आतां ।।१५६।।
आणि तूंचि ह्यांचा । करिशील नाश । तेव्हां चि विनाश । पावती हे? ।।१५७।।

---

१ रोग. २ वेड. ३ वाट फुटेल तिकडे. ४ सतत चालू असलेली. ५ खोटें.

होवोनि अर्जुना । अहंकारें भ्रांत । येथें ह्यांचा घात । चिंतिसी ना ॥१५८॥
तरी चिरंजीव । काय हे होतील । विचार सखोल । करीं ह्याचा ॥१५९॥
किंवा मारणारा । ह्यांसी तूं चि एक । मरता हा लोक । सकळ हि ॥१६०॥
ऐसी तुझ्या चित्तीं । असे जरी [1] भ्रांत । तरी ती त्वरित । सांडीं आतां ॥१६१॥
जन्म-मृत्यु हा तो । [2] निसर्ग-स्वभाव । अनादि हें सर्व । [3] स्वयंसिध्द ॥१६२॥
तरी सांगें आतां । कासया तूं खिन्न । गेलासी भुलोन । मूढपणें ॥१६३॥
धरूं नये तें चि । धरोनियां चित्तीं । सांगसी तूं नीति । आम्हालागीं ॥१६४॥
देखें सव्यसाची । मृत्यु आणि जन्म । हा तों मायाभ्रम । म्हणोनियां ॥१६५॥
विवेकी जे होती । घेवानि हा बोध । करिती ना खेद । दोहींचा हि ॥१६६॥

न त्वेवाहं जातु नाऽऽसं न त्वं नेमे जनाधिपा: ।
न चैव न भविष्याम: सर्वे वयमत: परम् ॥१२॥

ऐकें पार्था येथें । आम्ही तुम्ही पाहें । आणि भूपती हे । सकळ हि ॥१६७॥
इत्यादिक ऐसे । नित्य रहातील । किंवा मरतील । निश्चयें चि ॥१६८॥
सोडोनि ही भ्रांति । पाहतां निश्चितीं । दोन हि ह्या स्थिति । भासमात्र ॥१६९॥
उत्पत्ति-विनाश । मायेमुळें दिसे । साच आत्मा असे । अविनाश ॥१७०॥
अर्जुना वायूनें । हालविलें नीर । लाटेचा आकार । धरी जेव्हां ॥१७१॥
तेव्हां तेथें कोण । जन्मलें कोठोनि । आदि अंतीं पाणी । एकलें चि ॥१७२॥
मग वायूचें तें । थांबतां [4] स्फुरण । आलें स्थिरपण । उदकासी ॥१७३॥
तरी तेथें काय । नष्ट झालें आतां । विचार [5] तत्त्वतां । करीं ह्याचा ॥१७४॥

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।
तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥१३॥

ऐकें धनंजया । देह तरी एक । परी ते अनेक । वयोभेद ॥१७५॥
देखें येथें आहे । प्रत्यक्ष प्रमाण । नको अनुमान । करावया ॥१७६॥
ह्या देहीं आरंभीं । दिसे बाळपण । तारुण्यीं तें जाण । नष्ट होय ॥१७७॥
देह हा एकैक । ऐसी दशा पावे । परी तियेसवें । नासे ना तो ॥१७८॥

---

१ भ्रम. २ सृष्टि. ३ मूळचेंच असलेलें. ४ कंप; हालचाल. ५ खरोखर.

तैसे पंडुसुता । * चैतन्याच्या ठायीं । होती जाती पाहीं । नाना देह ॥१७९॥
नाशिवंत देह । जाईल सर्वथा । चैतन्याची [१] सत्ता । सर्वकाळ ॥१८०॥
ऐसें जाणे तया । [२] व्यामोहाचें दु:ख । होत नाहीं देख । कल्पांतीं हि ॥१८१॥

मात्रास्पर्शास्तु कौन्तेय शीतोष्णसुखदु:खदा:
आगमापायिनोऽनित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥१४॥

देखें इन्द्रियांच्या । होवोनि आधीन । वागे तया ज्ञान । नाकळे हें ॥१८२॥
* विषयांचे ठायीं । जडे त्याचें चित्त । म्हणोनि भ्रमांत । सांपडे तो ॥१८३॥
आपुले विषय । इंद्रियें सेविती । तेथें उपजती । हर्ष-शोक ॥१८४॥
ऐसा विषयांचा । घडतां [३] संसर्ग । तेणें अंतरंग । भ्रमे त्याचें ॥१८५॥
विषयांच्या ठायीं । एक भाव नाहीं । कांहीं सुख कांहीं । दु:ख दिसे ॥१८६॥
शब्द-विषयाची । पाहें पार्था व्याप्ति । निंदा आणि स्तुति । दोन्ही तेथें ॥१८७॥
कर्णद्वारें निंदा । ऐकतां स्वभावें । चित्त क्षोभ पावे । एकाएकीं ॥१८८॥
परी कानीं येतां । स्वभावतां स्तुति । उपजते प्रीति । अंतरांत ॥१८९॥
स्पर्श-विषयाचे । कोमल कठिण । ऐसे दोन्ही गुण । होती जे कां ॥१९०॥
त्वचेन्द्रियद्वारा । धनुर्धरा जाण । होती ते कारण । तोष-खेदां ॥१९१॥
एक तें सुंदर । एक तें [४] अघोर । रूपाचे प्रकार । ऐसे दोन ॥१९२॥
ते चि जीवालागीं । धनंजया देख । देती सुख-दु:ख । नेत्रद्वारा ॥१९३॥
जाणें [५] परिमळ । तो हि गा द्विविध । सुगंध दुर्गंध । ऐशा भेदें ॥१९४॥
[६] घ्राणेन्द्रियद्वारा । सुगंधें आनंद । दुर्गंधें विषाद । वाटे चित्ता ॥१९५॥
गोड आणि कडू । द्विविध हा रस । तैसा प्रीति-त्रास । उपजवी ॥१९६॥
म्हणोनि अर्जुना । विषयांचा संग । दावी अधोमार्ग । जीवालागीं ॥१९७॥
शीतोष्णादि द्वन्द्वें । ह्या परी पावोनि । जाय तो गुंतोनि । सुखदु:खीं ॥१९८॥
विषयांवाचोनि । नाहीं दुजें गोड । ऐसी जन्मखोड । इंद्रियांची ॥१९९॥
आणि पाहूं जातां । विषय हे कैसे । जैसें का आभासे । मृगजळ ॥२००॥
दिसावा इंद्राचा । स्वप्नीं ऐरावत । तैसे नाशिवंत । सर्वथैव ॥२०१॥

---

१ अस्तित्व; वास. २ भ्रांतीचें. ३ संगति. ४ भयंकर. ५ गंध; वास. ६ नाकावाटे.

३

म्हणोनियां ह्यांचा । नको धरूं संग । वेगें करीं त्याग । धनुर्धरा ।।२०२।।

यं हि न व्यथयन्त्येते पुरुषं पुरुषर्षभ ।
समदु:खसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ।।१५।।

देखें विषयांच्या । नव्हे जो आधीन । सुख-दुखांतून । सुटे तो चि ।।२०३।।
धनंजया तया । नाहीं गर्भवास । विषयांचा पाश । तुटे ज्याचा ।।२०४।।
तो चि तो तत्त्वतां । नित्यरूप पार्था । सहजें सर्वथा । ओळखावा ।।२०५।।

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सत: ।
उभयोरपि दृष्टोऽन्तस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभि: ।।१६।।

आतां कांहीं एक । सांगेन तें ऐक । जें का सुज्ञ लोक । ओळखिती ।।२०६।।
विश्वीं सर्वगत । *चैतन्य तें गुप्त । स्वीकारिती संत । तत्त्वज्ञ जे ।।२०७।।
मिसळलें जैसें । दूध आणि पाणी । काढी निवडोनि । *राजहंस ।।२०८।।
किंवा अग्निमाजीं । घालोनि सुवर्ण । तज्ञ चोख हीण । निवडिती ।।२०९।।
बुद्धिचातुर्यानें । घुसळितां दहीं । नवनीत पाहीं । दिसे अंतीं ।।२१०।।
भूस आणि बीज । एकत्रित जाण । परी पाखडून । घेतां जैसें ।।२११।।
बीज तें राहिलें । फोल तें उडालें । ऐसें कळों आलें । स्वभावें चि ।।२१२।।
तैसा सारासार । करितां विचार । सहजें संसार । [1] निरसला ।।२१३।।
मग तत्त्वतां तें । एकलें चि एक । उरे तत्त्व देख । ज्ञानियांसी ।।२१४।।
चैतन्य *उपाधि । दोहोंतील सार । तयांनीं साचार । ओळखिलें ।।२१५।।
म्हणोनि [2] अनित्य । संसाराच्या ठायीं । तयांसी तों नाहीं । सत्यबुद्धि ।।२१६।।

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ।
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ।।१७।।

देखें सारासार । करितां विचार । भ्रांति ती साचार । [3] असारता ।।२१७।।
उरे सार तें तों । स्वभावतां नित्य । त्रिवार हें सत्य । जाण पार्था ।।२१८।।
लोकत्रयाकार । जयाचा विस्तार । नसे त्या आकार । नाम [4] वर्ण ।।२१९।।
ऐसा [5] विलक्षण । सदा सर्वगत । जन्मक्षयातीत । असे जो का ।।२२०।।

---

१ नाहींसा झाला.　२ न टिकणारा.　३ निरुपयोगी भाग.　४ रंग.　५ वेगळ्या प्रकारचा; विशेष.

**धनंजया तया । आत्म्याचा निभ्रांत । केलिया हि घात । होत नाहीं ॥२२१॥**

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता: शरीरिण: ।
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ॥१८॥

**देहमात्र सर्व । विनाशी स्वभावें । म्हणोनि झुंजावें । अर्जुना तूं ॥२२२॥**

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् ।
उभौ तौ न विजानीतो नायं हन्ति न हन्यते ॥१९॥

**धरोनियां पार्था । देह-अभिमान । देह चि मानोन । आपणातें ॥२२३॥**
**मारिता मी तैसे । सर्व हे मरते । ऐसें भ्रांतचित्तें । बोलतोसी ॥२२४॥**
**न होती हे [१] वध्य । [२] साच पाहूं जातां । मारिता हि पार्था । न होसी तूं ॥२२५॥**

न जायते म्रियते वा कदाचिन्
नायं भूत्वा भविता वा न भूय: ।
अजो नित्य: शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥२०॥
वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ।
कथं स पुरुष: पार्थ कं घातयति हन्ति कम् ॥२१॥

**देखावें जें स्वप्नीं । स्वप्नीं चि तें [२] साच । जागृती येतांच । कांहीं नाहीं ॥२२६॥**
**तैसा जाणें पार्था । हा तों * मायाभास । [३] वायां गुंतलास । भ्रमामाजीं ॥२२७॥**
**जैसी शस्त्रें छाया । हाणितां अंगातें । सांगें काय [४] रुते । धनुर्धरा ॥२२८॥**
**किंवा [५] पूर्णकुंभ । उलंडतां जैसें । नष्ट झालें दिसे । भानु-बिंब ॥२२९॥**
**तया बिंबासवें । काय भानु नासे । स्वभावें तो असे । [६] निजस्थानीं ॥२३०॥**
**किंवा मठीं जैसें । *आकाश तें पाहें । होवोनियां राहे । मठाकार ॥२३१॥**
**भंगतां तो मठ । आकाश ना नासे । असे जैसें तैसें । मूळरूपीं ॥२३२॥**
**तैसें जरी पार्था । लोपलें शरीर । सर्वथा अमर । *आत्मतत्त्व ॥२३३॥**
**आत्मतत्त्वावरी । जन्ममृत्युरूप । भ्रांतीचा आरोप । नको करूं ॥२३४॥**

वासांसि जीर्णानि यथा विहाय ।

---

१ मारण्याजोगे. २ खरें. ३ कारणावांचून. ४ खुपतें. ५ भरलेलें मडकें. ६ स्वत:च्या जागीं.
* परिशिष्ट पहा.

नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णा -
न्यन्यानि संयाति नवानि देही ।।२२।।

टाकोनियां द्यावें । वस्त्र जैसें [1] जीर्ण । करावें धारण । मग नवें ।।२३५।।
तैसा [2] देही एक । शरीर सांडोन । स्वीकारी नूतन । मग दुजें ।।२३६।।

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।२३।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ।।२४।।

* उपाधिरहित । विशेषत्वें शुद्ध । असे नित्यसिद्ध । * अनादि हा ।।२३७।।
म्हणोनि घडे ना । शस्त्रें ह्याचा घात । * प्रळयोदकांत । बुडे ना हा ।।२३८।।
अग्नि असमर्थ । जाळावया ह्यातें । तेविं हा वायूतें । शोषवेना ।।२३९।।
सर्वत्र.हा नित्य । अचळ शाश्वत । असे सदोदित । परिपूर्ण ।।२४०।।

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते ।
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ।।२५।।

ध्यान [3] उत्कंठित । भेटावया ह्यास । तर्काच्या दृष्टीस । दिसे ना हा ।।२४१।।
पाहें निरंतर । दुर्लभ हा मना । तेविं साधवे ना । साधनीं हा ।।२४२।।
उत्तम पुरुष । असे हा अनंत । *गुणत्रयातीत । धनंजया ।।२४३।।
अनादि हा आत्मा । नित्य निर्विकार । तेविं निराकार । सर्वरूप ।।२४४।।
[4] आकळितां ह्यातें । ऐसा सर्वात्मक । हारपेल शोक । स्वभावें चि ।।२४५।।

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ।
तथापि त्वं महाबाहो नैवं शोचितुमर्हसि ।।२६।।

अविनाशी ऐसा । न जाणतां ह्यासी । जरी तूं मानिसी । नाशिवंत ।।२४६।।
तरी तुज पार्था । करावया शोक । कारण तें देख । नसे कांहीं ।।२४७।।
अर्जुना उत्पत्ति । स्थिति आणि लय । चाले हा [5] अक्षय । नित्यक्रम ।।२४८।।

---

१. जुने.　२ देह धारण करणारा जीव.　३ उत्सुक.　४ जाणला असतां.　५ कायम टिकणारा.

[१]जान्हवीचा जैसा । प्रवाह अखंड । वाहतो [२]उदंड । निरंतर ॥२४९॥
उगमीं उदक । नाहीं च खुंटलें । अंतीं तरी मिळे । सागरासी ॥२५०॥
आणि वाहतां तें । मध्यें निरंतर । [३]संचलें अपार । दिसे जैसें ॥२५१॥
प्राणिमात्रालागीं । तीन हि ह्या स्थिति । तैशापरी होती । अखंडित ॥२५२॥
कदापि हें सर्व । न ये थांबवाया । कासयासी वायां । खेद आतां ॥२५३॥
*अनादि हा ऐसा । चाले नित्यक्रम । निसर्गाचा धर्म । जाण पार्था ॥२५४॥
तुज मानेना हें । जरी हा पाहोन । [४]जन्मक्षयाधीन । *जीव-लोक ॥२५५॥
तरी नको खेद । करावया कांहीं । अटळ हे पाहीं । जन्म-मृत्यु ॥२५६॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥२७॥

जें जें जन्मा येई । तें तें लया जाई । नासलें तें घेई । पुन्हां जन्म ॥२५७॥
ऐसें घटिकायंत्र । फिरे अखंडित । जैसे उदयास्त । स्वभावें चि ॥२५८॥
तैसे जन्म-मृत्यु । जगीं अनिवार । सर्वथा साचार । धनंजया ॥२५९॥
कल्पान्ताच्या वेळीं । त्रैलोक्य हि नासे । अटळ हा असे । आदिअंत ॥२६०॥
आत्मा नाशिवंत । ऐसें तुझें मत । तरी हि उचित । नव्हे खेद ॥२६१॥
जाणोनि कां ऐसें । पांघरसी वेड । [५]विषाद हा सोड । धनुर्धरा ॥२६२॥
येथें नानापरी । विचारितां जाण । दिसे ना कारण । खेदालागीं ॥२६३॥

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ।
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥२८॥

जन्मापूर्वीं जीव । सर्व हे [६]अमूर्त । मग होती व्यक्त । जन्मतां चि ॥२६४॥
पावतां ते नाश । न जाती निभ्रांत । अन्य स्थितीप्रत । पाहें पार्था ॥२६५॥
परी तयांची जी । होती पूर्वस्थिति । तेथें चि *अव्यक्तीं । लीन होती ॥२६६॥
आतां मध्यें चि जो । आकाराचा भास । जैसें निद्रितास । दिसे स्वप्न ॥२६७॥
तैसा *माया-योगें । भासतो आकार । अर्जुना साचार । आत्मरूपीं ॥२६८॥
तरंगाच्या रूपें । भासतें उदक । पवनें जें देख । हालविलें ॥२६९॥

---

१ गंगेचा. २ पुष्कळ. ३ भरून राहिलें. ४ जन्म-मृत्यूच्या ताब्यांतील. ५ खेद. ६ न दिसणारे.
* परिशिष्ट पहा.

सुवर्णासी जैसें । अलंकारपण । यावया कारण । [1] परापेक्षा ॥२७०॥
* मायेमुळें तैसी । सृष्टी आकारली । अभ्रें जैसीं आलीं । आकाशांत ॥२७१॥
तैसें पार्था मूळीं । नाहीं चि जें [2] अंगें । कां गा खेद सांगें । तयासाठीं ॥२७२॥
म्हणोनि तूं आतां । अवीट जें एक । चैतन्य तें देख । धनंजया ॥२७३॥
तें चि परब्रह्म । देखावयासाठीं । [3] उत्कटता मोठी । साधुसंतां ॥२७४॥
म्हणोनि तयांसी । अवघा * विषय । सोडोनियां जाय । स्वभावें चि ॥२७५॥
तें चि परब्रह्म । भेटावें म्हणोन । [4] विरागी ते वन । स्वीकारिती ॥२७६॥
दृढ * तपोव्रतें । ब्रह्मचर्यादिक । आचरिती देख । मुनिश्रेष्ठ ॥२७७॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेन -
माश्चर्यवद्वदति तथैव चान्य: ।
आश्चर्यवच्चैनमन्य: शृणोति
श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥२९॥

एक ते अंतरीं । होवोनि निश्चळ । * चैतन्य केवळ । न्याहाळितां ॥२७८॥
गेले विसरोन । सकळ संसार । ध्यान-योगी थोर । महात्मे जे ॥२७९॥
करितां चि कोणी । गुण-संकीर्तन । चित्तासी होवोन । * उपरति ॥२८०॥
परब्रह्म-पदीं । श्रेष्ठ भक्तजन । जाहले तल्लीन । निरंतर ॥२८१॥
कोणी ज्ञानी ह्याचें । करोनि श्रवण । उपाधि सांडोन । शांत झाले ॥२८२॥
होवोनि तद्रूप । स्वानुभवें कोणी । योगी भक्त ज्ञानी । झाले सिद्ध ॥२८३॥
सरितांचे ओघ । जैसे का समस्त । जाती सागरांत । मिळोनियां ॥२८४॥
परी पार्था पाहें । न मावतां तेथें । परतले मागुते । ऐसें नाहीं ॥२८५॥
तद्रूप बुद्धीसी । होतां * साक्षात्कार । सिद्धांसी संसार । नुरे तैसा ॥२८६॥

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ।
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥३०॥

करूं जातां ज्याचा । होत नाहीं घात । सर्व हि देहांत । वसे जें का ॥२८७॥
असे जें सर्वत्र । तेविं [1] सर्वात्मक । चैतन्य तें एक । पाहें पार्था ॥२८८॥

---

१ दुसऱ्याची इच्छा-हेतु. २ खरोखर; प्रत्यक्ष. ३ उत्सुकता. ४ विरक्त. ५ सर्वात भरून राहिलेले.
* परिशिष्ट पहा.

*स्वभावें तेथें चि । होय जाय जग । तरी कां गा सांग । शोक आतां ॥२८९॥
नेणों कैसें तुज । माने ना हें पार्था । शोक हा सर्वथा । योग्य नोहे ॥२९०॥

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकम्पितुमर्हसि ।
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥३१॥

करोनि विचार । अजूनी हि पाहें । काय चिंतिसी हें । मनामाजीं ॥२९१॥
स्व-धर्माचा कैसा । पडला विसर । तरावें साचार । जेणें योगें ॥२९२॥
आतां कौरवांचें । वाटेल तें होवो । [१]प्रसंग वा येवो । तुजवरी ॥२९३॥
काय सांगूं फार । रणांगणीं येथ । जरी का *युगान्त । ओढवला ॥२९४॥
तरी पार्था पाहें । स्वधर्म जो आहे । तो गा [२]त्याज्य नोहे । सर्वथैव ॥२९५॥
जरी हृदयासी । फुटला पाझर । नाहीं तारणार । दयावृत्ति ॥२९६॥
म्हणोनि हें जाण । तुज अनुचित । सर्वथैव येथ । रणांगणीं ॥२९७॥
पाहें पार्था जरी । जाहलें [३]गोक्षीर । नाहीं पथ्यकर । [४]नवज्वरीं ॥२९८॥
ऐसें असोनी हि । [५]ज्वरार्त रोग्यासी । दिलें तरी त्यासी । मारक तें ॥२९९॥
म्हणोनि स्व-धर्म । सांडोनि वागतां । लागेल स्व-हिता । मुकावें गा ॥३००॥
तरी कशासाठीं । वायां व्याकुळता । पार्था, होईं आतां । सावधान ॥३०१॥
सेवितां कदापि । न घडे पतन । तो तूं ध्यानीं आण । निजधर्म ॥३०२॥
पाहें पंडु-सुता । मार्गें चि चालतां । अपाय सर्वथा । नोहे जैसा ॥३०३॥
किंवा प्रदीपाचा । आधार घेवोनि । चालूं जातां कोणी । ठेंचाळे ना ॥३०४॥
तैसें जरी घडे । स्वधर्माचरण । सहजें संपूर्ण । सर्व [६]काम ॥३०५॥
म्हणोनि संग्रामा- । वांचोनि आणिक । योग्य नाहीं देख । क्षत्रियांसी ॥३०६॥
परस्परांवरी । करावे प्रहार । समोरासमोर । राहोनियां ॥३०७॥
रणांगणीं ऐसें । लढावे सावेश । परी मनीं द्वेष । ठेवूं नये ॥३०८॥
असो पार्था, तुज । प्रत्यक्ष हें ठावें । काय तें बोलावें । फार आतां ॥३०९॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ।
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभन्ते युद्धमीदृशम् ॥३२॥

---

१ संकट. २ टाकण्यास योग्य. ३ गाईचें दूध. ४ मुदतीच्या तापांत.
५ तापाने पीडलेला. ६ इच्छा.

युद्धाचा हा नोहे । प्रसंग सामान्य । वाटे पूर्वपुण्य । फळा आलें ॥३१०॥
किंवा हें [1] निधान । सर्व हि धर्माचें । प्रकटलें साचें । तुम्हांपुढें ॥३११॥
नव्हे हा संग्राम । स्वर्ग मूर्तिमंत । अवतरे येथ । युद्धरूपें ॥३१२॥
किंवा मज वाटे । नव्हे हा संग्राम । तुझा पराक्रम । उगवला ॥३१३॥
किंवा [2] गुण-लुब्ध । कीर्ति आली आज । [3] वरावया तुज । उत्कंठेनें ॥३१४॥
पार्था, थोर पुण्य । क्षत्रियें करावें । तरी च पावावें । ऐसें युद्ध ॥३१५॥
जेविं मार्गें जातां । पाय आदळावा । तों तेथें मिळावा । *चिंतामणि ॥३१६॥
येवोनि जांभई । तोंड उघडावें । अमृत पडावें । तों चि त्यांत ॥३१७॥
तेविं अनायासें । जोडलें हें झुंज । धनंजया आज । तुजलागीं ॥३१८॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ।
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥३३॥

अव्हेरोनि ह्यातें । [4] लटक्याचा शोक । करितां निःशंक । हानि होय ॥३१९॥
नको नको हानि । करूं तुझी तूं च । जोडिलें जें साच । पूर्वजांनीं ॥३२०॥
नको धनंजया । घालवूं तें वायां । शस्त्र सांडोनियां । आज येथें ॥३२१॥
जोडल्या कीर्तीसी । येणें मुकशील । निंद्य तूं होशील । जगामाजीं ॥३२२॥
आणि महा-दोष । अर्जुना समस्त । येतील शोधीत । तुजलागीं ॥३२३॥
पार्था, पदोपदीं । पावे अपमान । नारी पतिहीन । जैशा परी ॥३२४॥
तैसी दशा जाण । स्वधर्मावांचोन । जीवितालागोन । प्राप्त होय ॥३२५॥
रणांगणीं प्रेत । पडे जें उघडें । फाडिती गिधाडें । चौ बाजूंनीं ॥३२६॥
तैसे महा-दोष । स्वधर्महीनास । घेरिती निःशेष । पंडु-सुता ॥३२७॥

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यन्ति तेऽव्ययाम्
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥३४॥

सोडोनि *स्वधर्म । जरी वागशील । धनी तूं होशील । पातकाचा ॥३२८॥
आणि दुष्कीर्तीचा । लागेल जो डाग । फिटेल ना मग । कल्पान्तींहि ॥३२९॥
शिवे ना दुष्कीर्ति । तोंवरी च पार्था । जगावें सर्वथा । जाणत्यानें ॥३३०॥

---

१ ठेवा. २ गुणांवर मोहित झालेली. ३ माळ घालण्यास. ४ कधींच नसलेल्या गोष्टीचा.

तरी सांगें आतां । युद्ध हें टाळून । रणांगणांतून । निघावें का ? ।।३३१।।
धरोनि करुणा । सांडोनि मत्सर । घेसील माघार । येथोनियां ।।३३२।।
तरी तें सर्वांसी । मानेल का सांगें । ते तुज [१] निजांगें । वेढितील ।।३३३।।
चार हि बाजूंनीं । मग होतां मारा । कैसा धनुर्धरा । सुटशील ।।३३४।।
प्राणावरी ऐसें । येतां चि संकट । दावील का वाट । दया-वृत्ति ।।३३५।।
प्रसंगें त्यांतून । वांचलासी नीट । तरी तें वाईट । मृत्युहून ।।३३६।।

भयाद्रणादुपरतं मंस्यन्ते त्वां महारथाः ।
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ।।३५।।

आणिक हि पाहें । येथें झुंजायास । धरोनि आवेश । आलासी तूं ।।३३७।।
आणि जरी आतां । निघशील मागें । स्वीकारोनि अंगें । दयावृत्ति ।।३३८।।
तरी तें ह्या दुष्टां । वाटेल का सत्य । पार्था तुझें कृत्य । सांगें मज ।।३३९।।

आवाच्यवादांश्च बहुन्वदिष्यन्ति तवाहिताः ।
निन्दन्तस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ।।३६।।

कैसा धनुर्धर । आम्हांसी हा भ्याला । पहा गेला गेला । पळोनियां ।।३४०।।
ऐशापरी वैरी । निंदितील देख । सांगें हा [२] कलंक । भला काय ।।३४१।।
बहुत सायास । करोनियां लोक । वाढविती एक । निज-कीर्ति ।।३४२।।
[३] कीर्ति-संवर्धन । करावया जाण । प्रसंगें स्व-प्राण । वेंचिती ते ।।३४३।।
जोडिली ती तुज अनायासें पूर्ण । जैसें का गगन । अद्वितीय ।।३४४।।
तैसी तुझी कीर्ति । [४] अतुल अनंत । तूं चि गुणश्रेष्ठ । तिन्हीं लोकीं ।।३४५।।
दिगंतींचे राजे । होवोनियां भाट । वाखाणिती श्रेष्ठ । यश तुझें ।।३४६।।
ऐकोनि तें यश । कृतांतादि सर्व । झाले [५] हतगर्व । घेती धाक ।।३४७।।
पार्था, तुझी कीर्ति । निर्मळ गहन । गंगानदी जाण । दिसे जैसी ।।३४८।।
थोरवी देखोनि । जगीं योद्धे भले । थिजोनियां गेले । आश्चर्यानें ।।३४९।।
सोडिली सर्वांनीं । जीविताची आस । अद्भुत पौरुष । ऐकोनियां ।।३५०।।
सिंहाची गर्जना । ऐकोनि युगान्त । होय मदोन्मत्त । हत्तीतें हि ।।३५१।।

---

१ स्वतः. २ डाग. ३ नावलौकिक वाढविणे. ४ तुलना करतां न येणारी. ५ ताठा नाहींसा झालेले.
* परिशिष्ट पहा.

सर्व कौरवांसी । तैसा तुझा धाक । वाटे अलौकिक । पराक्रम ॥३५२॥
पर्वत * वज्रातें । सर्प गरुडातें । तैसे सदा तूतें । मानिती हे ॥३५३॥
झुंजल्यावांचून । रणांगणांतून । जाशील निघून । जरी आतां ॥३५४॥
तरी तो महिमा । तुझा हारपून । अंगा हीनपण । येईल गा ॥३५५॥
निघालासी तरी । न पळूं देतील । तुज वेढितील । रणांगणीं ॥३५६॥
मग फजितीस । नाहीं पारावार । प्रत्यक्ष अपार । निंदा होतां ॥३५७॥
तिये वेळीं त्यांचे । भेदक ते बोल । तुझ्या झोंबतील । हृदयासी ॥३५८॥
तरी कां शौर्यानें । न झुंजावें आतां । भोगावें जिंकितां । [1] महीतळ ॥३५९॥

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ।
तस्मादुत्तिष्ठ कौन्तेय युद्धाय कृतनिश्चय: ॥३७॥

किंवा रणीं येथें । वेंचलें जीवित । तरी स्वर्ग प्राप्त । अनायासें ॥३६०॥
नको करूं आतां । आणिक विचार । ऊठ घे सत्वर । चाप-बाण ॥३६१॥
*स्वधर्म हा पार्था । आचरितां पाहीं । दोष असते हि । दूर होती ॥३६२॥
मग पातकाची । कोठून ही भ्रांति । येथें तुझ्या चित्तीं । उपजली ॥३६३॥
कोणी [2] नौकाधारें । बुडेल का सांग । ठेचाळेल चांग । मार्गें जातां ॥३६४॥
परी तें प्रसंगीं । तैसें हि घडेल । जरी न कळेल । जावें कैसें ॥३६५॥
होय विष–मिश्र । दुग्धाचें सेवन । तरी तें कारण । मृत्यूतें चि ॥३६६॥
तैसा फलाशेनें । सेवितां स्वधर्म । होय तेंचि कर्म । दोषयुक्त ॥३६७॥
म्हणोनि फलाशा । सांडोनि सर्वथा । पाप ना झुंजतां । क्षात्रधर्में ॥३६८॥

सुखदु:खे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥३८॥

होतां सुख–प्राप्ति । न जावें हर्षून । दु:खीं तरी खिन्न । होऊं नये ॥३६९॥
आणि होवो लाभ । किंवा होवो हानि । सर्वथा तें मनीं । धरूं नये ॥३७०॥
होईल विजय । येईल वा मृत्यु । पुढील हें [3] चिंतूं । [3] नये आधीं ॥३७१॥
स्वधर्मानुसार । वागतां उचित । पावे तें [4] निवांत । [5] साहावें गा ॥३७२॥

---

१ पृथ्वी (चा पृष्ठभाग). २ नावेच्या आश्रयानें. ३ काळजी करूं नयें. ४ शांतपणे. ५ सहन करावें.

ऐशा परी मन । ठेवितां अलिप्त । स्वभावें [१] दुरित । घडे चि ना ॥३७३॥
म्हणोनि निभ्रांत । करावया युद्ध । धनंजया, सिद्ध । होईं आतां ॥३७४॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ।
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबन्धं प्रहास्यसि ॥३९॥

*सांख्य-तत्त्वज्ञान । ऐसें हें संक्षिप्त । सांगितलें येथ । तुजलागीं ॥३७५॥
*बुद्धियोगाचा तो । निश्चित सिद्धान्त । सांगतसें चित्त । देईं आतां ॥३७६॥
येथें बुद्धियोग । साधितां हा पार्था । बाधे ना सर्वथा । कर्म-बंध ॥३७७॥
शस्त्रांचा वर्षाव । करूं ये सहन । [२] कवच लेवोन । वज्राऐसें ॥३७८॥
काय सांगूं मग । नुरोनियां भय । संपूर्ण विजय । लाभे जैसा ॥३७९॥

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥४०॥

बुद्धियोगें तैसें । नासे ना [३] ऐहिक । अनायासें देख । मोक्ष-लाभ ॥३८०॥
आपुल्या कर्मांचा । *पूर्व-अनुक्रम । [४] चोखाळे उत्तम । येणें योगें ॥३८१॥
कर्मीं तरी सुखें । वर्तावें किरीटी । नसावी [५] आसक्ति । कर्म-फळीं ॥३८२॥
मांत्रिकातें जैसें । झपाटी ना भूत । तैसा उपाधींत । राहे तरी ॥३८३॥
तया बुद्धियुक्ता । न बाधे उपाधि । प्राप्त होतां सिद्धि । *नैष्कर्म्याची ॥३८४॥
स्पर्शती ना जेथें । पुण्य आणि पाप । असे जी [६] निष्कंप । अतिसूक्ष्म ॥३८५॥
सत्त्व रज तम । *त्रिगुणांचा लेप । न लागे निर्लेप । ऐसी जी का ॥३८६॥
*साम्यबुद्धि साच । अल्प चि अंतरीं । प्रकाशली जरी । पुण्य-बळें ॥३८७॥
तरी धनंजया । संसाराचें भय । लोपोनियां जाय । संपूर्णत्वें ॥३८८॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन ।
बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥४१॥

दिसावया सान । असे दीप-ज्योति । परी बहु [१] दीप्ति । देई जैसी ॥३८९॥
तैसी सद्बुद्धि ही । म्हणूं नये अल्प । प्रकाश अमूप । असे जिचा ॥३९०॥
अपेक्षिती ज्ञानी । हिज नाना परी । पार्था, चराचरीं । दुर्लभ ही ॥३९१॥

---

१ पाप. २ चिलखत. ३ ह्या लोकांतील (गोष्टी). ४ शुद्ध होतो. ५ मन गुंतलेलें असणें.
६ स्थिर. ७ तेज. *परिशिष्ट पहा.

आणिकांसारिखा । न जोडे * परीस । भाग्यें लाभे [१] लेश । अमृताचा ।।३९२।।
तैसी सद्‌बुद्धीची । दुर्लभ ही वाट । पोंचवी जी थेट । * परंधामा ।।३९३।।
गंगेलागीं जैसा । नित्य निरंतर । निर्वाणीं सागर । एकला चि ।।३९४।।
तैसें जिला नाहीं । दुजें प्राप्तिस्थान । ईश्वरावांचोन । जगीं कांहीं ।।३९५।।
ती च एक पाहें । अर्जुना सद्‌बुद्धि । अन्य ती दुर्बुद्धि । ऐसें जाण ।।३९६।।
दुर्बुद्धि ती जाण । विषयांची खाण । तेथें रममाण । होती मूढ ।।३९७।।
म्हणोनियां स्वर्ग– । नरक-संसार । तयांसी साचार । प्राप्त होय ।।३९८।।
ऐसे जे का मूढ । तयांलागीं पार्था । लाभे ना सर्वथा । * आत्मसुख ।।३९९।।

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चितः ।
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ।।४२।।
कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ।
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ।।४३।।
भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ।
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ।।४४।।

वेदांचा आधार । घेवोनि बोलती । [२] प्रतिष्ठा वर्णिती । कर्माची च ।।४००।।
परी कर्म-फळीं । धरोनियां आस । पार्था, स्व-हितास । मुकती ते ।।४०१।।
मृत्युलोकीं येथें । घेवोनियां जन्म । यज्ञादिक कर्म । आचरावें ।।४०२।।
मग रम्य ऐसें । कर्माचें तें फळ । भोगावें केवळ । स्वर्ग-सुख ।।४०३।।
सर्व सुखांमाजीं । स्वर्गसुख श्रेष्ठ । बोलती [३] यथेष्ट । दुर्बुद्धी ते ।।४०४।।
देवोनि केवळ । भोगाकडे दृष्टि । चित्तीं फलासक्ति । ठेवोनियां ।।४०५।।
विविध विशेष । आचरिती कर्म । यथाविधि धर्म । अनुष्ठिती ।।४०६।।
अनुष्ठितां धर्म । दाविती नैपुण्य । एक चि [४] वैगुण्य । परी तेथें ।।४०७।।
कीं ते स्वर्ग-भोग । वांछिती मनांत । सांडोनि यथार्थ । [५] भोक्ता जो का ।।४०८।।
सर्व हि यज्ञांचा । भोक्ता [६] परमेश । विसरती त्यास । [७] अल्पज्ञ ते ।।४०९।।
करोनियां जैसा । कापुराचा ढीग । द्यावी त्यासी आग । लावोनियां ।।४१०।।

---

१ थोडासा भाग. २ महत्त्व. ३ वाटेल तसे. ४ दोष. ५ भोगणारा. ६ परमेश्वर. ७. अडाणी.
* परिशिष्ट पहा.

किंवा मिष्टान्नाचें । वाढोनियां ताट । त्यांत काळकूट । कालवावें ।।४११।।
अमृताचा कुंभ । लाभतां सुदैवें । त्यातें उलंडावें । [१] पदाघातें ।।४१२।।
तैसा संपादिला । धर्म धनंजया । घालविती वायां । [२] सकामत्वें ।।४१३।।
जोडोनि सुकृत । करोनि सायास । धरावी कां आस । संसाराची ।।४१४।।
परी अज्ञानी ते । नेणती हें कांहीं । काय कीजे नाहीं । ज्ञानदृष्टि ।।४१५।।
सुगरिणीनें जैसें । रांधोनि पक्वान्न । टाकावें विकोन । द्रव्यासाठीं ।।४१६।।
तैसा भोगासाठीं । घालविती धर्म । नेणोनियां [३] वर्म । कर्मांतील ।।४१७।।
म्हणोनि वेदांच्या । * अर्थवादीं जाण । होवोनियां मग्न । राहिले जे ।।४१८।।
अविवेकी मूढ । तयांचिया चित्तीं । सर्वथा [४] दुर्मति । वास करी ।।४१९।।

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ।
निर्द्वन्द्वो नित्यसत्त्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ।।४५।।

सत्त्व रज तम । त्रिगुणांनीं व्याप्त । वेद हे निभ्रांत । जाण पार्था ।।४२०।।
उपनिषदादि । समस्त सात्त्विक । रजतमात्मक । इतर ते ।।४२१।।
[५] विवरिलें जेथें । * कर्मकांडादिक । एक स्वर्ग-सुख । सुचविती ।।४२२।।
म्हणोनि सर्वथा । धनंजया जाण । होती ते कारण । सुखदुःखां ।।४२३।।
तरी अर्थवादीं । नको देऊं चित्त । अव्हेरीं त्वरित । त्रिगुण हे ।।४२४।।
मी-माझें हें पार्था । न ठेवीं अंतरीं । एकलें चि धरीं । * आत्मसुख ।।४२५।।

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ।
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ।।४६।।

* विधि-निषेधाचे । विविध प्रकार । वर्णिले साचार । वेदांमाजीं ।।४२६।।
असो जरी ऐसें । बोलिलें बहुत । तरी ज्यांत हित । तें चि घ्यावें ।।४२७।।
अशेष हि मार्ग । पडती दृष्टीस । येतां उदयास । भानु-बिंब ।।४२८।।
तरी पार्था पाहें । सर्व हि मार्गांनीं । चाले काय कोणी । सांगें मज ।।४२९।।
जरी भू-तळीं तें । अपार उदक । घ्यावें आवश्यक । तेवढें चि ।।४३०।।
तैसा वेदार्थाचा । करोनि विचार । ज्ञानी इष्ट सार । तें चि घेती ।।४३१।।

---

१ लाथाडून. २ फलासक्तिमुळे. ३ खुबी. ४ वाईट बुध्दि. ५ स्पष्ट करून सांगितले.
* परिशिष्ट पहा.

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गोऽस्त्वकर्मणि ॥४७॥

तरी ऐकें आतां । ह्यापरी पाहतां । *स्वकर्म हें पार्था । योग्य तुज ॥४३२॥
सर्व हि गोष्टींचा । करितां विचार । ऐसें चि साचार । मना आलें ॥४३३॥
पार्था, नये सोडूं । निज-कर्तव्यास । नये धरूं आस । कर्म-फळीं ॥४३४॥
आणि [१]कुकर्माची । न व्हावी संगती । करावी सत्कृति । हेतुविण ॥४३५॥

योगस्थ: कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ।
सिद्ध्यसिद्ध्यो: समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥४८॥

सोडोनि [२]फलाशा । होवोनि *योग-स्थ । देवोनियां चित्त । करीं कर्मे ॥४३६॥
आरंभिलें कर्म । सुदैवें सिद्धीस । गेलें तरी तोष । नको फार ॥४३७॥
किंवा दुर्दैवें तें । नाहीं झालें सिद्ध । तरी दु:खें क्षुब्ध । होऊं नये ॥४३८॥
सिद्ध झालें तरी । काजा आलें पाहीं । न झालें तरी हि । भलें मानीं ॥४३९॥
घडे तें तें कर्म । होतां ब्रह्मार्पण । स्वभावें संपूर्ण । झालें जाण ॥४४०॥
पाहें पूर्णापूर्ण । कैसें असो कर्म । परी मनोधर्म । सारिखा चि ॥४४१॥
तरी पार्था होय । ती च *योगस्थिति । तिज वाखाणिती । ज्ञाते जन ॥४४२॥
आपुल्या चित्ताची । जी का *साम्यावस्था । तें चि जाण पार्था । *योगसार ॥४४३॥

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ।
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणा: फलहेतव: ॥४९॥
बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।
तस्माद्योगाय युज्यस्व योग: कर्मसु कौशलम् ॥५०॥

मन-बुद्धीमाजीं । जेथें एकभाव । तया ऐसें नांव । *बुद्धियोग ॥४४४॥
बुद्धियोगाची ती । पाहतां महती । दिसे गौण अति । कर्मभाग ॥४४५॥
परी तें चि कर्म । आचरावें [३]साङ्ग । तरीच हा योग । प्राप्त होय ॥४४६॥
पाहें धनंजया । कर्तृत्वाचा [४]मद । आणि [५]फलास्वाद । गाळोनियां ॥४४७॥
उरे जें जें कर्म । ती च येथें जाण । स्वभावें संपूर्ण । योगस्थिति ॥४४८॥

---

१ दुष्कृत्याची. २ कर्मफळाची इच्छा. ३ पूर्णपणें. ४ अभिमान; ताठा. ५ कर्मफळाची गोडी.
* परिशिष्ट पहा.

तरी होईं स्थिर । बुद्धियोगीं थोर । करोनि अव्हेर । फलाशेचा ।।४४९।।
पार्था, बुद्धियोग । साधिला जयांनीं । पावले ते ज्ञानी । [1] पैलपार ।।४५०।।
नाहीं तयां पुण्य । नाहीं तयां पाप । तुटे आपोआप । * द्वन्द्व-बंध ।।४५१।।

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिण: ।
जन्मबन्धविनिर्मुक्ता: पदं गच्छन्त्यनामयम् ।।५१।।

पार्था, योगी तरी । वर्तती कर्मांत । परी [2] अनासक्त । कर्म-फलीं ।।४५२।।
म्हणोनियां तयां । पाहें धनुर्धरा । नाहीं [3] येरझारा । गर्भवास ।।४५३।।
मग जें [4] शाश्वत । * ब्रह्मानन्दें पूर्ण । पावती तें स्थान । योग-युक्त ।।४५४।।

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ।
तदा गन्तासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ।।५२।।

जिये वेळीं मोह । सोडोनि देशील । * वैराग्य ठसेल । अंतरांत ।।४५५।।
तिये वेळीं तैसा । तूं हि पंडु-सुता । होशील सर्वथा । योगयुक्त ।।४५६।।
निर्दोष गहन । मग * आत्मज्ञान । प्रकटेल जाण । धनंजया ।।४५७।।
तुझिया मनाचे । * संकल्प-विकल्प । तेणें आपोआप । थांबतील ।।४५८।।
ऐसी * साम्यावस्था । पावतां आणिक । जाणायाचें देख । नुरे कांहीं ।।४५९।।
किंवा पार्था, पूर्वीं । जाणिलें जें कांहीं । तेथें नको तें हि । आठवाया ।।४६०।।

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ।
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ।।५३।।

इंद्रियांच्या संगें । बुद्धि जी चंचल । पुन्हां स्थिरावेल । आत्मरूपीं ।।४६१।।
*आत्मसुखीं बुद्धि । होतां चि निश्चळा । पावसी सकळा । *योग-स्थिति ।।४६२।।

अर्जुन उवाच–
स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ।
स्थितधी: किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ।।५४।।

पार्थ म्हणे तेव्हां । कृपानिधे देवा । सर्व हा सांगावा । अभिप्राय ।।४६३।।
विचारावें आतां । तुज सविस्तर । ऐसें वारंवार । मनीं येतें ।।४६४।।

---

१ पलीकडे. २ न गुंतलेला. ३ जन्ममरणाच्या फेऱ्या. ४ कायम टिकून राहणारे.

मग तो अच्युत । तयालागीं बोले । विचारीं जें भलें । वाटे तुज ।।४६५।।
पार्था, सांगें तुझ्या । मनींची [१] जिज्ञासा । सुखें हवा तैसा । प्रश्न करीं ।।४६६।।
ऐकोनि हे बोल । पार्थ म्हणे देवा । कैसा ओळखावा । *स्थितप्रज्ञ ।।४६७।।
स्थिरबुद्धि ऐसें । बोलती कोणास । जाणावया त्यास । काय खूण ।।४६८।।
भोगी ब्रह्मानंदीं । अखंड *समाधि । राहोनि *उपाधि-। माजीं जो का ।।४६९।।
कोणे रूपीं कैसा । प्रपंचीं तो राहे । देवा, सांगावें हें । सर्व कांहीं ।।४७०।।
तदा [२] मूर्त ब्रह्म । *षड्गुणसंपन्न । देव नारायण । काय बोले ।।४७१।।

श्री भगवानुवाच–
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवाऽऽत्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ।।५५।।

म्हणे पार्था ऐक झणीं । [३] बळी काम जो का मनीं ।।४७२।।
तो चि आणी अडथळा । करी *स्व-सुखावेगळा ।।४७३।।
जीव सदा नित्य तृप्त । परी गुंते विषयांत ।।४७४।।
ऐसा जयाचा प्रभाव । तया 'काम' ऐसें नांव ।।४७५।।
सर्वथा तो काम जाई । [४] आत्मतुष्ट मन राही ।।४७६।।
तो चि स्थितप्रज्ञ जाण । तुज सांगितली खूण ।।४७७।।

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ।
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ।।५६।।

नाना दुःखें झालीं प्राप्त । तरी खेद ना चित्तांत ।।४७८।।
आणि सुखाचिया हांवे–। माजीं गुंते ना स्वभावें ।।४७९।।
पार्था तयाचिया ठायीं । काम क्रोध सहजें नाहीं ।।४८०।।
नेणे भयातें केव्हां हि । परिपूर्णपणें राही ।।४८१।।
भाव बाणला [५] अभेद । ऐसा जो का अमर्याद ।।४८२।।
ज्यानें सोडिली उपाधि । तो चि जाण स्थिरबुद्धि ।।४८३।।

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।

---

१ जाणून घेण्याची इच्छा. २ मूर्तिमंत. ३ बलवान्. ४ आत्मानंदाने समाधानी. ५ ऐक्यभाव.
* परिशिष्ट पहा.

नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।५७।।

[१] उच्च-नीच ऐसा पार्था । भेदाभेद न करितां ।।४८४।।
सारिखा चि सकलांस । देई [२] पूर्णेंदु प्रकाश ।।४८५।।
तैसा ठेवी समभाव । सर्वां भूतीं जो सदैव ।।४८६।।
ऐसी अखंड समता । भूतमात्रीं सदयता ।।४८७।।
आणि येवो कैसी वेळ । चित्त होई ना चंचल ।।४८८।।
कांहीं भलें प्राप्त झालें । तरी हर्षें जो ना डोले ।।४८९।।
आणि पावतां वाईट । [३] विषादे ना ज्याचें चित्त ।।४९०।।
ऐसा हर्ष-शोकादिक । द्वद्वांतून मुक्त देख ।।४९१।।
आत्मबोधें परिपूर्ण । तो चि प्रज्ञायुक्त जाण ।।४९२।।

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इंन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ।।५८।।

जैसा हर्षला कासव । सोडी मोकळे अवयव ।।४९३।।
[४] इच्छावशें आवरोन । घेई आपुले आपण ।।४९४।।
तैसीं सर्व इंद्रियें तीं । ज्याच्या आज्ञेंत वागती ।।४९५।।
ज्याचीं इंद्रियें स्वाधीन । तो चि स्थितप्रज्ञ जाण ।।४९६।।

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ।।५९।।

पार्था आणिक हि एक । ऐक सांगेन कौतुक ।।४९७।।
भोग त्यजावया पाहें । सज्ज झाले जे [५] निग्रहें ।।४९८।।
इंद्रियांतें आवरिती । परी गोडी न सांडिती ।।४९९।।
तयां साधकां घेरिती । ते चि भोग नाना रीती ।।५००।।
जेविं वृक्षाची पालवी । वरीवरी च खुटावी ।।५०१।।
आणि मूळीं द्यावें जळ । तरि कैसा तो मरेल ।।५०२।।
कीं तो जळाच्या आधारें । जैसा अधिक विस्तारे ।।५०३।।

---

१ श्रेष्ठकनिष्ठ. २ पूर्णचंद्र. ३ कष्टी होत नाहीं. ४ इच्छेप्रमाणे. ५ हट्टाने.

४

तैसे गोडीच्या प्रभावें । भोग वाढती स्वभावें ।।५०४।।
बळें इंद्रियांपासोन । भोग टाकिले तोडोन ।।५०५।।
तोडिले ते जाती जरी । सुटे ना ती गोडी तरी ।।५०६।।
असे कीं हा [1] रस जाण । इंद्रियांचा जीव प्राण ।।५०७।।
म्हणोनियां तयावीण । होती इंद्रियें नि:प्राण ।।५०८।।
पार्था, *साधका साचार । होतां *ब्रह्म-साक्षात्कार ।।५०९।।
रसाचें हि [2] नियमन । मग स्वभावें संपूर्ण ।।५१०।।
देहभाव ते नासती । भोग इंद्रियें विसरती ।।५११।।
*सोऽहं-भावाचा प्रत्यय । येतां ऐसी स्थिति होय ।।५१२।।

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इंद्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ।।६०।।

नाहीं तरी हें अर्जुना । साधनानें साधूं ये ना ।।५१३।।
इंद्रियांतें आवरोन । वागती जे रात्रंदिन ।।५१४।।
यम–नियमांचें कुंपण । तयांभोंवतें घालोन ।।५१५।।
अभ्यासाची देखरेख । नित्य ठेविती जे देख ।।५१६।।
राहती जे धनंजया । मन मुठीं धरोनियां ।।५१७।।
तयांतें हि भोग ओढी । ऐसी इंद्रियांची [3] प्रौढी ।।५१८।।
करोनियां कासावीस । छळिती तीं साधकास ।।५१९।।
जैसी मांत्रिकातें जाण । भूल घालिते डाकीण ।।५२०।।
*ऋद्धि-सिद्धीच्या निमित्तें । प्राप्त होती भोग त्यातें ।।५२१।।
मग इंद्रियांच्या द्वारा । सुरू होय त्यांचा मारा ।।५२२।।
[4] लाचावलें मन तेथें । तरी अधिकाधिक गुंते ।।५२३।।
मग पार्था काय सांगूं । अभ्यासीं तें होय [5] पंगु ।।५२४।।
ऐसें इंद्रियांचें बळ । करी चित्तातें चंचल ।।५२५।।

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ।

---

१ विषयांतील गोडी. २ ताब्यांत ठेवणें. ३ सामर्थ्य. ४ लोभामुळे गुंतले. ५ दुबळें.
*परिशिष्ट पहा.

वशे हि यस्येन्द्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६१॥

* अनासक्ति-बळें पार्था । ह्यांसी [1] निर्दळी सर्वथा ॥५२६॥
भोग-सुखें होतां प्राप्त । चित्त होई ना मोहित ॥५२७॥
* मज एकातें अंतरीं । विसंबे ना क्षणभरी ॥५२८॥
आत्मबोधें परिपूर्ण । तोचि स्थितप्रज्ञ जाण ॥५२९॥
वरिवरि जरी । सोडिले विषय । परि गोडी होय । अंतरांत ॥५३०॥
तरी साधकासी । [2] साद्यन्त संसार । चुके ना साचार । धनंजया ॥५३१॥
अंशमात्र विष । तें हि होतें फार । कराया संहार । जीविताचा ॥५३२॥
येथें नाहीं पार्था । सर्वथा संशय । तैसा चि विषय । लेशमात्र ॥५३३॥
राहे जरी देखें । साधकाचे मनीं । तरी पूर्ण हानि । विवेकाची ॥५३४॥

ध्यायतो विषयान्पुंस: सङ्गस्तेषुपजायते ।
सङ्गात्संजायते काम: कामात्क्रोधोऽभिजायते ॥६२॥
क्रोधाद्भवति संमोह: संमोहात्स्मृतिविभ्रम: ।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥६३॥

विषयांचें जरी । अंतरीं स्मरण । * विरक्त हि जाण । [3] लिप्त होय ॥५३५॥
होतां अंतरांत । आसक्तीचा जन्म । प्रकटतो काम । मूर्तिमंत ॥५३६॥
प्रकटतां काम । दिलें क्रोधें ठाण । आधीं चि गा जाण । तेथें पार्था ॥५३७॥
जेथें क्रोध तेथें । आला अविचार । स्वभावें साचार । धनंजया ॥५३८॥
[4] चण्डवातें जैसी । विझे दीप-ज्योति । तैसी लोपे [5] स्मृति । अविचारें ॥५३९॥
किंवा अस्तमानीं । रवि-प्रकाशातें । सर्वस्वीं ग्रासिते । रात्र जैसी ॥५४०॥
देखें साधकाची । तैसी होय स्थिति । सर्वथा ती स्मृति । लोपतां चि ॥५४१॥
मग अज्ञानांध । होवोनि केवळ । देखे तो सकळ । * तमोव्याप्त ॥५४२॥
तेणें तयाचिया । बुद्धीलागीं पार्था । येई व्याकुळता । अंतरांत ॥५४३॥
देखें जन्मांधासी । पळावें लागावें । मग तें जैसें धावे । सैरावैरा ॥५४४॥
तैसें स्मृति-भ्रंशें । बुद्धीचें भ्रमण । चाले रात्रंदिन । धनुर्धरा ॥५४५॥

---

१ नाश करतो. २ आरंभापासून अखेरपर्यंत. ३ गुंतलेला. ४ वादळानें ५ आत्मस्वरूपाचें स्मरण.

होतां सर्वथैव । बुद्धीचा गोंधळ । नासतें समूळ । ज्ञानजात ।।५४६।।
बुद्धि-नाशें होय । त्याची स्थिति तैसी । प्राण जातां जैसी । शरीराची ।।५४७।।
जैसा [1] इंधनातें । लागोनि [2] स्फुल्लिंग । भडकतां आग । विश्वा पुरे ।।५४८।।
तैसें * विषयांचें । अल्प हि चिंतन । एवढें पतन । पाववितें ।।५४९।।

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन् ।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ।।६४।।

म्हणोनियां सर्व । विषय हे पार्था । सोडावे सर्वथा । मनानें चि ।।५५०।।
सोडितां विषय । स्वभावें निःशेष । मग * प्रीतिद्वेष । दूर होती ।।५५१।।
आणिक हि पार्था एक । तुज सांगतसें ऐक ।।५५२।।
मग इंद्रियें दहा हि । सर्व विषयांचे ठायीं ।।५५३।।
जरी झालीं रममाण । तरी अलिप्त तो पूर्ण ।।५५४।।
जेथें प्रीति-द्वेष नाहीं । तेथें बाधक तें काई ? ।।५५५।।
सूर्य जैसा आकाशांत । असे राहिला अलिप्त ।।५५६।।
निज-किरणांच्या हातें । स्पर्शे सर्व हि जगातें ।।५५७।।
तरी त्यासी काय लागे । [3] संग-दोष मज सांगें ।।५५८।।
तैसा जो का मनांतून । * इंद्रियार्थी [4] उदासीन ।।५५९।।
आत्मरसें परिपूर्ण । असे काम-क्रोध-हीन ।।५६०।।
विषयीं हि त्यासी कांहीं । आत्मरूपाविण नाहीं ।।५६१।।
मग विषय ते काई । कोणा बाधतील पाहीं ! ।।५६२।।
जरी जळीं बुडे जळ । ज्वाळेमाजीं जळे ज्वाळ ।।५६३।।
तरी संग-दोषें लिप्त । होय पूर्ण योग-युक्त ।।५६४।।
स्वयें सर्वरूप आहे । सर्व आत्मरूप पाहे ।।५६५।।
जाण अर्जुना निभ्रांत । तो चि स्थितप्रज्ञ संत ।।५६६।।

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ।।६५।।

---

१ जळणाला; सरपणाला.　२ किटाळ; ठिणगी.　३ आसक्तीची बाधा.　४ तटस्थ.

चित्त ज्याचें सर्वकाळ । राहे प्रसन्न निर्मळ ।।५६७।।
कैसीं स्पर्शतील तया । [१] भव-दु:खें धनंजया ।।५६८।।
दिव्य अमृताची झरी । वाहे जयाचे अंतरीं ।।५६९।।
तया शिवे ना कल्पान्तीं । भूकतहानेची भीति ।।५७०।।
तैसें प्रसन्न हृदय । तरी दु:ख कोठें काय ।।५७१।।
मग आपोआप पाहें । बुद्धि आत्मरूपीं राहे ।।५७२।।
जैसा निर्वातींचा दीप । कदा काळीं नेणे कंप ।।५७३।।
तैसा स्व-रूपीं [२] निवांत । स्थितप्रज्ञ योग-युक्त ।।५७४।।

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ।
न चाभावयत: शान्तिरशान्तस्य कुत: सुखम् ।।६६।।

बुद्धियोगाचा विचार । नाहीं अंतरीं साचार ।।५७५।।
तो चि गुंते भोग-पाशीं । [३] श्वेतवाहना [४] सर्वांशीं ।।५७६।।
तया बुद्धीची स्थिरता । नसे कधीं हि सर्वथा ।।५७७।।
चित्त रहावें निर्मळ । ऐसी नाहीं तळमळ ।।५७८।।
[५] निश्चळत्त्वाची भावना । जरी मनातें शिवे ना ।।५७९।।
तरी अर्जुना तयासी । शांति लाभेल ती कैसी ।।५८०।।
आणि शांतीचा ओलावा । जया नरा नाहीं ठावा ।।५८१।।
तेथें सुख चुकोनि हि । प्रवेशे ना पार्था पाहीं ।।५८२।।
जैसा पातक्याच्या ठायीं । मोक्ष राहेना केव्हां हि ।।५८३।।
अग्निमाझारीं भाजलें । बीज जरी उगवलें ।।५८४।।
तरी असोनि अशांति । घडूं शके सुख-प्राप्ति ।।५८५।।
म्हणोनियां ऐक पार्था । मनाची जी चंचलता ।।५८६।।
तें चि सर्वस्व दु:खाचें । ऐसें जाणोनियां साचें ।।५८७।।
इंद्रियांतें आवरिलें । तरी सर्वथा तें भलें ।।५८८।।

इन्द्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ।

---

१ संसारातील दु:खें. २ शांत; स्थिर. ३ अर्जुना. ४ पूर्णपणें. ५ स्थिरपणाची.

तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवाम्भसि ॥६७॥

जें जें सांगती इंद्रियें । तें तें करिती जे स्वयें ॥५८९॥
तरले ते ऐसें वाटे । तरी सर्वथा तें खोटें ॥५९०॥
पार्था, [१] भोगसिंधु पार । नाहीं झाले ते साचार ॥५९१॥
तीर नावेनें गांठावें । तों चि वादळ सुटावें ॥५९२॥
मग चुकला [२] अपाय । तो चि पुनरपि होय ॥५९३॥
तैसा असो ज्ञाता भला । जरी भोगाधीन झाला ॥५९४॥
जें जें आवडे इंद्रियां । तें तें तयां देवोनियां ॥५९५॥
कौतुकानें केले लाड । परी पुढें अवघड ॥५९६॥
साधनांत झाली चुकी । बुडाला तो भव-दुःखीं ॥५९७॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥६८॥

जरी स्वभावतां जाण । होती इंद्रियें स्वाधीन ॥५९८॥
मग अर्जुना सार्थक । असे काय तें आणिक ॥५९९॥
जैसा हर्षला कासव । सोडी मोकळे अवयव ॥६००॥
इच्छावशें आवरोन । घेई आपुले आपण ॥६०१॥
तैसीं सर्व इंद्रियें तीं । ज्याच्या आज्ञेंत वागती ॥६०२॥
ज्याचीं इंद्रियें स्वाधीन । तो चि स्थितप्रज्ञ जाण ॥६०३॥
आतां आणिक हि एक । पार्था, सांगेन तें ऐक ॥६०४॥
पूर्ण-पुरुषाचें लक्षण । असे जें का अति गहन ॥६०५॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ।
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥६९॥

लागलीसे [३] झोंप जगा । असे तेथें चि जो [४] जागा ॥६०६॥
[५] जीवमात्र जेथें जागे । तेथें ज्यासी झोंप लागे ॥६०७॥
तो चि नित्य निरंतर । जाण पार्था मुनीश्वर ॥६०८॥

---

१ विषयरूपी समुद्र.　२ धोका; अपघात.　३ बेसावधपणा.　४ सावध.　५ सर्व प्राणी.

ऐसा जो का * निरुपाधि । अर्जुना तो स्थिरबुद्धि ।।६०९।।

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं
समुद्रमाप: प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत्कामा यं प्रविशन्ति सर्वे
स शान्तिमाप्नोति न कामकामी ।।७०।।

आणिक हि एके परी । जाणों येईल [१] अवधारीं ।।६१०।।
जैसा सागर प्रशांत । असे पार्था अखंडित ।।६११।।
ओघ नद्यांचे समस्त । पूर्ण मिसळले त्यांत ।।६१२।।
तरी अल्प हि न वाढे । सोडि सीमा हें न घडे ।।६१३।।
किंवा येतां ग्रीष्मकाळ । नद्या आटल्या सकळ ।।६१४।।
परी सागराचे जळीं । नाहीं उणीव भासली ।।६१५।।
तैसी ऋद्धिसिद्धि येतां । बुद्धीलागीं [२] अक्षोभता ।।६१६।।
आणि न हो त्यांची प्राप्ति । तरी न चळे धीरवृत्ति ।।६१७।।
सांगें सूर्यासी पांडवा । हवा दाखवाया दिवा ।।६१८।।
दिवा मालविला तरी । का तो कोंडेल अंधारीं ? ।।६१९।।
ऋद्धिसिद्धि तैशा परी । आली किंवा गेली तरी ।।६२०।।
नसे तयासी आठव । ऐसा [३] बाणला स्वभाव ।।६२१।।
कीं तो निजान्तरीं पूर्ण । महासुखीं झाला [४] मग्न ।।६२२।।
रम्य स्व-गृहा पाहोन । तुच्छ ज्यासी इंद्र-भुवन ।।६२३।।
त्यासी भिल्लाची झोंपडी । सांग पार्था कैसी ओढी ।।६२४।।
अमृतासी नांवें ठेवी । तो न जैसा [५] कांजी सेवी ।।६२५।।
तैसा * स्वानुभवी योगी । * ऋद्धि-सिद्धीतें न भोगी ।।६२६।।
पार्था, नवल हें देख । तुच्छ जेथें स्वर्ग-सुख ।।६२७।।
तेथें ऋद्धि-सिद्धि गौण । मग पुसे त्यांसी कोण ।।६२८।।

विहाय कामान्य:सर्वान्पुमांश्चरति नि:स्पृह: ।

---

* परिशिष्ट पहा. १ लक्षांत घे. २ चंचलपणा न येणें. ३ पक्का झाला. ४ गढून गेलेला. ५ पेज.

निर्ममो निरहंकार: स शान्तिमधिगच्छति ।।७१।।

ऐसा आत्मज्ञानें तुष्ट । ब्रह्मानन्दें [1] परिपुष्ट ।।६२९।।
तो चि स्थितप्रज्ञ भला । जाण अर्जुना एकला ।।६३०।।
दूर करोनि मीपणा । सर्व सोडोनि कामना ।।६३१।।
स्वयें विश्व होवोनि तो । विश्वामाजीं वावरतो ।।६३२।।

एषा ब्राह्मी स्थिति: पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ।
स्थित्वा स्यामन्तकालेऽपि ब्रह्मनिर्वाणमृच्छति ।।७२।।
इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे
श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्याय: ।।२।।

ऐसा * ब्रह्मभाव । अर्जुना [2] नि:सीम । भोगितां निष्काम । जाहले जे ।।६३३।।
परब्रह्म-पद । नित्य परिपूर्ण । पावले ते जाण । अनायासें ।।६३४।।
ज्ञानरूप होतां । [3] रोधिते ना चित्ता । तयां व्याकुळता । देहान्तींची ।।६३५।।
ती च ब्रह्मस्थिति । स्वमुखें श्रीपति । सांगे पार्थाप्रति । ऐकें राजा ।।६३६।।
संजय तो बोले । ऐसी [4] कृष्ण-वाणी । ऐकोनियां मनीं । पार्थ म्हणे ।।६३७।।
आमुचिया [5] काजा । आला युक्तिवाद । आतां श्रीगोविंद । बोलिला जो ।।६३८।।
बुद्धियोग श्रेष्ठ । कर्ममात्र गौण । त्याज्य तीं म्हणोन । सर्व कर्में ।।६३९।।
तरी आतां नको । मज झुंजावया । कासया हें वायां । घोर कर्म ।।६४०।।
ऐसा [6] आशंकोन । आनंदें अर्जुन । आतां भला प्रश्न । विचारील ।।६४१।।
असे तो प्रसंग । सुरस सुंदर । धर्माचें आगर । सकळ हि ।।६४२।।
कीं तो विवेकाचा । अमृत-सागर । अनंत अपार । परिपूर्ण ।।६४३।।
सर्वज्ञांचा राजा । स्वयें कृष्णनाथ । संवादेल जेथ । अर्जुनाशीं ।।६४४।।
तीच कथा आतां । निवृत्तीचा दास । सांगे श्रोतयांस । ज्ञानदेव ।।६४५।।

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी

द्वितीयोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

* परिशिष्ट पहा. १ पोसलेला. २ अपार. ३ कोंडीत नाहीं. ४ कृष्णाचें बोलणें. ५ उपयोगी. ६ शंका घेऊन.